13 JAN 2026

लोकमत

# क्विक Update

## शिवाजी विद्यापीठ हॉकी संघात तोरसकर

कोल्हापूर : आंतरविद्यापीठ हॉकी



स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात हरीश किरण तोरसकर याची निवड झाली. भोपाळ मध्य प्रदेश येथे ही स्पर्धा १७ जानेवारीपर्यंत होणार आहे. तो विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी आणि छावा मित्रमंडळाचा खेळाडू आहे. त्याला विजय साळोखे, सुदाम तोरसकर, विकास जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

1 3 JAN 2026

सकाळ



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ लॉन टेनिस स्पर्धेत यशस्वी झालेल्या संघासोबत प्रशिक्षक आरिफ सिद्दीकी उपस्थित होते.

# आंतरविद्यापीठ टेनिस स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाचे यश


**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : केडीएलटीच्या टेनिस सेंटरवर झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ लॉन टेनिस स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने तिसरा क्रमांक पटकाविला. या संघाची जयपूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली.

या संघात अश्विन नरसिंघानी, प्रथमेश पाटील, ओंकार शिंदे, अंकित बठेजा, पृथ्वी या खेळाडूंचा समावेश आहे. या खेळाडूंना केडीएलटीएचे मुख्य प्रशिक्षक अरिफ सिद्दीकी, प्रशिक्षक संजय साळुंखे, सागर फडतारे, संजय पास्वान, यशवंत कोळी, उत्तम फराकटे यांचे मार्गदर्शन लाभले.

13 JAN 2026

जनप्रवास




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कास्यपदकप्राप्त खेळाडूंबरोबर प्रशिक्षक.

# आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला तीन 'कास्य'

**जनप्रवास : कोल्हापूर**

भोपाळ (मध्यप्रदेश) येथील संजीव अग्रवाल विद्यापीठातील साऊथ-वेस्ट विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने तीन कांस्यपदके पटकाविली. स्पर्धेत सहभागी पाचही खेळाडूंची निवड चंदिगड (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली.

कांस्यपदक विजेते असे, निकिता कमलाकर (५८ किलो), राजनंदिनी आमने (६९ किलो), ईश्वरी पवार (७७ किलो), तनुजा पोळ (६३ किलो, चतुर्थ क्रमांक), श्रावणी जाधव (५८ किलो, पाचवा क्रमांक).

यांना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र -कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. रवींद्र चव्हाण, प्रशिक्षक म्हणून डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

1 3 JAN 2026

लोकमत




भोपाळ येथील संजीव अग्रवाल विद्यापीठातील साऊथ-वेस्ट विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने तीन कांस्यपदके पटकाविली.

# वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला तीन कांस्यपदके

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भोपाळ (मध्य प्रदेश) येथील संजीव अग्रवाल विद्यापीठात सुरू असलेल्या साऊथ-वेस्ट विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने तीन कांस्यपदके पटकाविली. पाचही खेळाडूंची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली.

स्पर्धेत सहभागी झालेल्या नीकिता कमलाकर (५८ किलो), राजनंदिनी आमने (६९ किलो), ईश्वरी पवार (७७ किलो), तनुजा पोळ (६३ किलो, चतुर्थ क्रमांक), श्रावणी जाधव (५८ किलो, पाचवा क्रमांक) या पाचही खेळाडूंनी कांस्यपदक जिंकले. त्यांची चंदीगड (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र -कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

संघ व्यवस्थापक म्हणून देवचंद महाविद्यालयाचे डॉ. रवींद्र चव्हाण, प्रशिक्षक म्हणून श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

13 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज




# आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला तीन कांस्यपदके

**कोल्हापूर, : महान्यूज अँड व्ह्यूज):**

भोपाळ (मध्य प्रदेश) येथील संजीव अग्रवाल विद्यापीठात सुरू असलेल्या साऊथ-वेस्ट विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने तीन कांस्यपदके पटकाविली. स्पर्धेत सहभागी झालेल्या एकूण पाचही खेळाडूंची निवड चंदीगड (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली.




कांस्यपदक विजेत्या खेळाडू अशा: निकिता कमलाकर (५८ किलो), राजनंदिनी आमने (६९ किलो), ईश्वरी पवार (७७ किलो), तनुजा पोळ (६३ किलो, चतुर्थ क्रमांक), श्रावणी जाधव (५८ किलो, पाचवा क्रमांक).

या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि क्रीडा संचालक प्रा.डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून देवचंद महाविद्यालयाचे डॉ. रवींद्र चव्हाण, प्रशिक्षक म्हणून श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

13 JAN 2026

पुढारी



# आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास तीन कांस्यपदके

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भोपाळ (मध्य प्रदेश) येथील संजीव अग्रवाल विद्यापीठात सुरू असलेल्या साऊथ-वेस्ट विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने तीन कांस्यपदके पटकाविली. स्पर्धेत सहभागी पाचही खेळाडूंची निवड चंदीगड (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली.

कांस्यपदक विजेत्या खेळाडूंमध्ये निकिता कमलाकर (५८ किलो), राजनंदिनी आमने (६९ किलो), ईश्वरी पवार (७७ किलो), तनुजा पोळ (६३ किलो, चतुर्थ क्रमांक), श्रावणी जाधव (५८ किलो, पाचवा क्रमांक) यांचा समावेश आहे. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र -कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून देवचंद महाविद्यालयाचे डॉ. रवींद्र चव्हाण, प्रशिक्षक म्हणून शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

13 JAN 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिंदीची ज्ञानभाषेकडे झालेली वाटचाल महत्त्वपूर्ण

## प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव; विद्यापीठात विश्व हिंदी दिवसानिमित्त कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

देशामध्ये सामाजिक, सांस्कृतिक एकोपा जोपासण्याबरोबरच हिंदी भाषेने ज्ञानभाषा म्हणून चालविलेली वाटचाल महत्त्वपूर्ण स्वरुपाची आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ हिंदी व क्रीडा अधिविभाग तसेच राजभाषा विभाग, यूको बँक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विश्व हिंदी दिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. डॉ. जाधव म्हणाल्या, भाषा मानवाची सांस्कृतिक ओळख निर्माण करते. मानवी प्रगतीतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे भाषेची निर्मिती. वर्तमानात जागतिक पातळीवर भारतीय भाषांनी आपले महत्त्व सिद्ध केले आहे. जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची असलेली हिंदी भाषा आहे.

यानिमित्ताने आयोजित जी. डी. बिर्ला स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते हिंद केसरी दीनानाथ सिंह यांनी राजर्षि शाहू महाराजांनी निर्माण केलेली कोल्हापूरची कुस्ती परंपरा आणि हिंदकेसरी बनण्यापर्यंतचा प्रवास सांगितला. यूको बँकेचे राजभाषा अधिकारी अमरदीप कुलश्रेष्ठ यांनी राजभाषा, राष्ट्रभाषा व संपर्क भाषा यांतील फरक स्पष्ट करताना हिंदी भाषेच्या प्रचार-प्रसाराचे महत्त्व अधोरेखित केले.

हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश निकम यांनी परिचय करून दिला. अविनाश कांबळे व शीतल चौगले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अक्षय भोसले यांनी आभार मानले. यावेळी यूको बँकेच्या विद्यानगर शाखेचे प्रबंधक क्रांतिकुमार देवरे, क्रीडा अधिविभागाचे डॉ. एन. डी. पाटील, कार्यक्रम समन्वयक डॉ. जयसिंग कांबळे, अनमोल कोठाडिया, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुवर्णा गावडे, प्रा. प्रतीक्षा हुंबरे उपस्थित होते.

1 3 JAN 202

सकाळ

# वि.स.खांडेकर यांची जयंती विद्यापीठात साजरी

**कोल्हापूर :** मराठी साहित्यास पहिले भारतीय ज्ञानपीठ परितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त रविवारी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते वि. स. खांडेकर यांच्या अर्धपुतळ्यात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. उदयसिंह राजेयादव, स्मृती संग्रहालयाचे सहकारी नितीन गंगधर, ऐश्वर्या भुरटे, शीतल कांबळे आदी उपस्थित होते.

13 JAN 2026

जनप्रवास

# हिंदीची ज्ञानभाषेकडची वाटचाल महत्त्वपूर्ण : जाधव

कोल्हापूर : देशामध्ये सामाजिक, सांस्कृतिक एकोपा जोपासण्याबरोबरच हिंदी भाषेने ज्ञानभाषा म्हणून चालविलेली वाटचाल महत्त्वपूर्ण स्वरुपाची आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा हिंदी आणि क्रीडा अधिविभाग तसेच राजभाषा विभाग, यूको बँक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विश्व हिंदी दिवस साजरा केला. त्यावेळी त्या बोलत होत्या. जी. डी. बिर्ला स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते हिंदकेसरी दिनानाथ सिंह यांनी आपला प्रवास सांगितला. हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश निकम यांनी परिचय करून दिला. अविनाश कांबळे व शीतल चौगले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अक्षय भोसले यांनी आभार मानले. यावेळी युको बँकेच्या विद्यानगर शाखेचे प्रबंधक क्रांतिकुमार देवरे, क्रीडा अधिविभागाचे डॉ. एन. डी. पाटील, डॉ. जयसिंग कांबळे, अनमोल कोठाडिया, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुवर्णा गावडे, प्रा. प्रतीक्षा ठुंबरे होते.

13 JAN 2026
तरुण भारत

# तंत्रज्ञानासाठी शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन महत्वाचा

## डॉ. दिपक ताटपुजे : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

बदलत्या शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या स्वीकारासाठी शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन पुणे येथील विद्यादीप फाउंडेशनचे संशोधक सल्लागार डॉ. दीपक ताटपुजे यांनी केले.


शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम–उषा योजनेंतर्गत 'विविध विद्याशाखांच्या अध्यापन व अध्ययनासाठी ई–कन्टेन्ट विकसन आणि ऑनलाइन पेडगॉजी' या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी उपस्थित होत्या. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. वर्षा मैंदर्गी म्हणाल्या, ई–कन्टेन्ट ही आज काळाची गरज बनली आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून बदलत्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून दर्जेदार ज्ञान देणे आवश्यक आहे.

डॉ. नितीन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले. नाझिया मुल्लाणी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. नगीना माळी यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

13 JAN 2026

तरुण भारत



# मतदानादिवशी शिवाजी विद्यापीठाला सुट्टी

**कोल्हापूर** : कोल्हापूर महानगरपालिका निवडणूक मतदान दिवशी शिवाजी विद्यापीठास सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवक तसेच संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य संचालक, अधिकारी व सेवकांना ही सुट्टी लागू करण्यात आली आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील केंद्र शासनाची शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका आदींना सार्वजनिक सुट्टी जाहीर केलेली आहे. त्याअनुषंगाने शिवाजी विद्यापीठास गुरुवार, दि.१५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

1 3 JAN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून आजअखेर ४७३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ४७३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. सोमवारी एमबीए, बीएड, बीएस्सी (बीएड), एमबीए (डिस्टन्स), एमकॉम, बीटेक आदी २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध ५७ केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला ४ हजार ८४६ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १२ रोजी एमए (इतिहास), बीए (स्पोर्टस्), एमकॉमसह विविध १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

13 JAN 2026

तरुण भारत

# विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांचे निकाल

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर – २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील सोमवारी १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

आज अखेर ४७३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. सोमवारी विविध २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध ५७ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून परीक्षांसाठी ४८४६ विद्यार्थी उपस्थित होते.

13 JAN 2026
तरूण भारत

# वि. स. खांडेकर यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** मराठी साहित्याला पहिले भारतीय ज्ञानपीठ परितोषिक मिळवून देणारे ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी शिवाजी विद्यपीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते वि. स. खांडेकर यांच्या अर्धपुतळयात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच वि. स. खांडेकर यांच्या गाजलेल्या विविध साहित्याला उजाळा देण्यात आला. यावेळी संग्रहालय संचालक डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. उदयसिंह राजेयादव तसेच स्मृती संग्रहालयाचे सहकारी नितीन गंगधर, ऐश्वर्या भुरटे आणि शीतल कांबळे आदी उपस्थित होते.

1 3 JAN 2026

तरुण भारत

# हिंदीची ज्ञानभाषेकडे वाटचाल महत्वपूर्ण : डॉ. ज्योती जाधव

प्रतिनिधी

कोल्हापूर

देशामध्ये सामाजिक, सांस्कृतिक एकोपा जोपासण्याबरोबरच हिंदी भाषेने ज्ञानभाषा म्हणून चालविलेली वाटचाल महत्त्वपूर्ण स्वरुपाची आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा हिंदी आणि क्रीडा अधिविभाग तसेच राजभाषा विभाग, यूको बँक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विश्व हिंदी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

डॉ. जाधव म्हणाल्या, भाषा मानवाची सांस्कृतिक ओळख निर्माण करते. मानवी प्रगतीतील महत्वपूर्ण टप्पा म्हणजे भाषेची निर्मिती. वर्तमानात जागतिक पातळीवर भारतीय भाषांनी आपले महत्व सिद्ध केले आहे. जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची असलेली हिंदी भाषा आपला गौरव आहे.

यूको बँकेचे राजभाषा अधिकारी अमरदीप कुलश्रेष्ठ यांनी हिंदी भाषेच्या प्रचार-प्रसाराचे महत्व अधोरेखित केले. हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश निकम यांनी परिचय करून दिला. अविनाश कांबळे व शीतल चौगले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अक्षय भोसले यांनी आभार मानले.

यावेळी यूको बँकेच्या विद्यानगर शाखेचे प्रबंधक क्रांतीकुमार देवरे, क्रीडा अधिविभागाचे डॉ. एन. डी. पाटील, डॉ. जयसिंग कांबळे, अनमोल कोठाडिया, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुवर्णा गावडे, प्रा. प्रतीक्षा ठुंबरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 JAN 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur,
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात वि.स.खांडेकर यांची जयंती साजरी

**कोल्हापूर, : महान्यूज अँड व्ह्यूज):**

मराठी साहित्यास पहिले भारतीय ज्ञानपीठ परितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि.स.खांडेकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त काल (दि. ११) विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या वि.स.खांडेकर स्मृती संग्रहालय येथे शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांच्या हस्ते वि.स. खांडेकर यांच्या अर्धपुतळ्यात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप,डॉ. उदयसिंह राजेयादव तसेच स्मृती संग्रहालयाचे सहकारी नितीन गंगधर, ऐश्वर्या भुरटे आणि शीतल कांबळे आदी उपस्थित होते.



1 3 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.-9175089609

# शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती

**कोल्हापूर, : महान्यूज अँड व्ह्यूज):**

राजमाता जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती आज शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.



विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ.ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ.श्रीकृष्ण महाजन, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.संजय चव्हाण, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. कैलास सोनवणे, डॉ.अजित कोळेकर, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, गजानन पळसे, डॉ.वैशाली सावंत, डॉ.ज्योती खराडे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

13 JAN 2026

सकाळ

# विद्यापीठात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती

कोल्हापूर : राजमाता जिजाऊसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती सोमवारी शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये सकाळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

13 JAN 2026

तरुण भारत



कोल्हापूर : राजमाता जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना मान्यवर.

# विद्यापीठात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. संजय चव्हाण, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. कैलास सोनवणे आदी उपस्थित होते.

13 JAN 2026

पुढारी

## संक्षिप्त



# शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते.